**<u>दोषारोपपुर्व पुरावाः—</u>**

**<u>खटला क्र. ६८९/एसडब्ल्यु/२०००</u>** **<u>निशाणी क्र. ४७</u>**

साक्षीदार क्र. १

मी शपथपुर्वक सांगतो की,

माझे नाव : देवेंद्र बेचा शेट्टी,

वय : ७२ वर्षे,

व्यवसाय : निवृत्त,

पत्ता : घाटकोपर, मुंबई

**<u>सरतपासणी वकील श्री. प्रदिप भुटा :—</u>**

१. हॉटेल व्यवसायात येण्यापूर्वी मी सिंडीकेट बॅकेमध्ये, औदयोगिक संर्पक, अधिकारी म्हणून कार्यरत होतो. सदरील नोकरी ही भारतामध्ये बदलीपात्र असल्याने मी सदरील नोकरी सोडून हॉटेल व्यवसायात येण्याचे ठरवले. सन २०१२ मध्ये मी सदरील नोकरीतून सेवानिवृत्ती स्विकारली.

२. आरोपी क्र. १ व २ यांची बहिण श्रीमती. विमला कामत या सिंडीकेट बॅकेमध्ये माझ्या सहकारी होत्या. त्यानी मला सेवा निवृत्तीनंतर कुठलातरी व्यवसाय करण्याबाबत सल्ला दिला होता. मार्च १९९५ मध्येच श्रीमती. विमला कामत यांनी माझी आरोपी क्र. १ गुरुकुर प्रभु याच्याशी ओळख करुन दिली होती. त्यावेळी आरोपी क्र. ५ सतिष प्रभु हा देखिल त्याठिकाणी हजर होता. मला श्रीमती. विमला कामत व श्री. सतिष प्रभु यांनी स्वराज्य रेस्टॉरंट, गोखले रोड, मुंबई येथे नेले होते. सदरील रेस्टॉरंट हे ब—याच काळापासून बंद अवस्थेत होते त्यामुळे त्याच्या नुतनीकरणासाठी बराच खर्च अपेक्षित होता. मी आरोपी क्र. १ शी चर्चा झाल्यानंतर माझे मित्र श्री. होटकर, श्रीमती. सरला, श्रीमती. जयलक्ष्मी, यांच्याशी चर्चा केली होती. त्यांनी मला ते आर्थिक मदत करायला तयार आहेत असू सांगून पुढे जाण्यास सांगितले.

३. त्यानंतर मी मार्च १९९५ मध्ये स्प्रेट्रा इंटेरिअर या संस्थेला हॉटेलच्या नुतनीकरणाबाबत सांगितले. सदरील संस्थेने १२,९२,४१० रुपये नुतनीकरणासाठी खर्च येईल असे इस्टीमेट देउन सांगितले. त्यानंतर मी सदरील खर्चाची तरतुद

करण्यासाठी सारस्वत बॅकेकडे कर्जाची सुविधा मागितली होती. सारस्वत बॅकेने ५,००,००० रुपये कर्ज देण्याबाबत मला आश्वासित केले. त्यावेळी सदरील हॉटेल याची मालकी माझ्याकडे नव्हती. सदरील हॉटेलची माहिती आरोपी क्र. १ गुरुपुर प्रभु व आरोपी क्र. ३ पोर्णिमा प्रभु यांच्याकडे होती. त्यांनी मी सदरील हॉटेल रक्कम रुपये २५,००,००० च्या मोबदल्यात घेण्याचे ठरवले असून सदरील मोबदल्याची रक्कम पुढील ५ वर्षामध्ये अदा करावयाची असल्याचे नमूद करुन सदरील हॉटेलच्या मिळकतीवर मला कर्ज देण्यास त्यांची कुठलीही हरकत नाही याबाबत नाहरकत प्रमाणपत्र लिहून दिले. सदरील कर्ज प्रकरणामध्ये आरोपी क्र. १ गुरुपुर प्रभु व आरोपी क्र. २ लीना प्रभु हे साक्षीदार होते. मला बॅकेच्या अधिका—याने कर्ज प्रकरणाच्या एकुण रक्कमेच्या २ टक्के रक्कम ही शेअर म्हणून बॅकेत ठेवायला लागेल अशी अट घातली होती. त्यावेळी साधारणपणे एकुण कर्ज रक्कमेच्या २ टक्के म्हणजेच १०,००० रुपये ऐवढी रक्कम वजा करण्यात आली. (फिर्यादीचे विधिज्ञ यांनी असे प्रतिपादन केले की, प्रस्तुतचे प्रकरण हे २५ वर्ष जुने आहे व साक्षीदाराचे वय ७२ वर्ष आहे. त्यामुळे साक्षीदारास जे दस्त संदर्भी करायचे आहे हे प्रस्तुत प्रकरणात दाखल आहेत किंवा कसे याची तपासणी करायची आहे त्यामुळे सरतपास तहकुब करावा अशी विनंती केली. सबब, फिर्यादीच्या विधिज्ञाच्या तोंडी विनंती वरुन पुढील सरतपास तहकुब करण्यात येत आहे.)

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : १४/०७/२०२५.**